पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळ ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७७। किंमत - ४ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार २३/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# भंडारदरा पाणलोटात पावसाचे तांडव
## भंडारदरा धरण ७५ टक्के, तर निळवंडे ४० टक्के भरले


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - उत्तर नगर जिल्ह्यासाठी जीवनदायिनी ठरलेल्या भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या चार-पाच दिवसांपासून मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. सततच्या संततधार पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू झाली असून भंडारदरा धरणाचा पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे. सध्या धरण ७३.५९ टक्के भरले असून, निळवंडे धरणातही ३८ टक्के पाणीसाठा झाला आहे.

मुसळधार पावसामुळे अकोले तालुक्यातील आदिवासी भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना पाळीव जनावरे घरातच बांधण्याची वेळ आली आहे. थंड वाऱ्यासह पडणाऱ्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून डोंगरदऱ्यांमधील घराघरांत शेकोट्या पेटल्या आहेत.

दरम्यान, सह्याद्रीच्या काळ्या कातळांवरून कोसळणारे शुभ्र धबधबे पर्यटकांना भुरळ घालत आहेत. ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने संपूर्ण परिसर निसर्गसौंदर्याने खुलून गेला आहे.

यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाल्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते. मात्र, गेल्या काही दिवसांतील दमदार पावसामुळे भात लागवडीस पोषक वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांनी शेतीकामांना वेग दिला आहे. त्यामुळे बळीराजामध्ये समाधानाचे वातावरण आहे.

२४ तासांतील पावसाची नोंद - घाटघर - १८५ मिमी, रतनवाडी - १७४ मिमी, पांजरे - १६० मिमी, भंडारदरा - १२९ मिमी, वाकी - १२२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

सध्या भंडारदरा धरणातील पाणीसाठा ८,१२४ दशलक्ष घनफूट इतका झाला असून धरण ७३.५९ टक्के भरले आहे. पावसाचा हा जोर कायम राहिल्यास धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निळवंडे धरणातील पाणीसाठ्यातही सातत्याने वाढ होत असून भविष्यातील पिण्याच्या पाण्यासह सिंचनाच्या दृष्टीने ही दिलासादायक बाब मानली जात आहे.

# शरद पवार यांची मोदींशी भेट तर ठाकरेंचा मोदी सरकारवर हल्लाबोल



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाने आता राष्ट्रीय राजकारणाचे केंद्रस्थान गाठले आहे. विविध राज्यांतील विद्यार्थी परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब आणि शैक्षणिक सुधारणांच्या मागण्यांसाठी आंदोलन करत असून, विरोधी पक्षातील अनेक प्रमुख नेत्यांनी आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला आहे.

मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी जंतरमंतरवर जाऊन आंदोलक विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधत त्यांनी त्यांच्या अडचणी, मागण्या आणि परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमिततेबाबत माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आपण त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वासही त्यांनी दिला.

याच पार्श्वभूमीवर बुधवारी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत नेमक्या कोणत्या विषयांवर चर्चा झाली याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसली, तरी जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलन आणि त्यांच्या मागण्यांचा मुद्दा उपस्थित झाला का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. काल विद्यार्थ्यांची भेट आणि आज पंतप्रधानांशी चर्चा या घडामोडींमुळे या बैठकीकडे विशेष लक्ष लागले आहे.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही जंतरमंतरवर जाऊन आंदोलक विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला. (पान २ वर)



जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

# जरांगे जंतर-मंतरवर



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

नवी दिल्लीतील जंतरमंतरवर जाऊन आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतल्यानंतर मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर घणाघाती टीका केली आहे. काहीही झालं तरी जंतरमंतरवरील जागा सोडू नका, वेळ पडल्यास सर्व मराठे दिल्लीत येतील, असा शब्द जरांगे यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे. विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या सरकारला 'उलटं करण्याची' ताकद आपल्यात असून, पुन्हा हल्ला झाल्यास नेत्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली आहे.

जंतरमंतरवर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मनोज जरांगे यांनी त्यांना या लढ्यात खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले. आंदोलन शांततेच्या मार्गानेच करा आणि काहीही झालं तरी ही (पान २)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे


महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री
मा. श्री. देवेंद्र फडणवीस
यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !
दैनिक युवावार्ता परिवार, संगमनेर

अर्थ | आरोग्य | अध्यात्म
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
कडलग इन्व्हेस्टमेंट आयोजित
विशेष आर्थिक साक्षरता मेळावा-2026
गुरुवार, दि. 30 जुलै 2026 रोजी सायं. 6 वा.
मालपाणी हेल्थ क्लब, कासारवाडी, संगमनेर 422 605
उद्घाटक : डॉ. ओमप्रकाश सिकची (माजी चेअरमन, संगमनेर मर्चंट्स को-ऑप बँक लि.)
विषय : जागतिक घडामोडी आणि म्युच्युअल फंड गुंतवणूकदार...काल, आज आणि उद्या
प्रमुख वक्ते : मा.श्री. पलक शाह (गुंतवणूकदार वर्तन तज्ज्ञ)
प्रमुख उपस्थिती : मा.श्री. विक्रमसिंह परदेशी (रिजनल मॅनेजर, एन. जे. वेल्थ, नाशिक)
म्युच्युअल फंड सेवेला 20 वर्षे पूर्ण
तसेच 200 कोटींचा AUM व दोन कोटींची SIP बुक
हा टप्पा पूर्ण केल्याबद्दल आपल्या सर्वांना या मेळाव्यासाठी आमंत्रित करीत आहोत
आपले विनीत
आदित्य कडलग (डायरेक्टर, कडलग इन्व्हेस्टमेंट, संगमनेर)
सुनील कडलग (संस्थापक, कडलग इन्व्हेस्टमेंट, संगमनेर)
नोंदणीसाठी खालील नंबरवर संपर्क करा
स्वाती : 9150 306 306 । आकांक्षा : 9150 304 304
शुभम : 9142 55 9000 । प्रतिक्षा : 9142 66 8000 । मानसी : 9142 77 3000
एस.5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरियल, संगमनेर, जि. अहिल्यानगर

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# अमृतवाहिनी आय.टी.आय. च्या १०७ विद्यार्थ्यांची बजाजऑटो लि. पुणे कंपनीमध्ये निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेरः- अमृतवाहिनी आय.टी.आय. अमृतनगर, संगमनेर येथे दिनांक १४ जुलै २०२६ रोजी बजाज ऑटो लि. पुणे या नामांकित कम्पनीचा कॅम्पस इंटरव्यू नुकताच पार पडला. या कंपनीचे श्री. गणेश जाधव एच. आर. मॅनेजर, श्री. तान्हाजी पाटील प्रोडक्शन मॅनेजर यांनी अंतिम वर्षाच्या मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेडच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या, त्यापैकी एकूण १०७ विद्यार्थ्यांची निवड केली. या मुलाखतीसाठी सौ. सरस्वती शिंदे टाटा स्ट्राइव्ह प्रोजेक्ट कॉर्डिनेटर यांनी सहकार्य केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे, यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी आय.टी.आय. ची स्थापना १९८४ साली केली. संस्थेने गुणवत्तेत सातत्य राखल्याने संस्थेचा नावलौकिक वाढला आहे. येथील शैक्षणिक वातावरण, निसर्ग सुंदर परिसर, शिस्त, स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व आधुनिक सुविधा यामुळे विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यू मध्ये नामांकित कंपन्यांमध्ये निवड होत आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब थोरात साहेब, विश्वस्त मा.श्री.डॉ. सुधीरजी तांबे साहेब, विश्वस्त सौ.शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडेमिक डॉ. जे.बी. गुरव, आय.टी.आय.चे प्राचार्य श्री.व्ही.व्ही. भाटे व श्री. नामदेव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. इंटरव्ह्यू यशस्वी होण्यासाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभाग व सर्व स्टाफ ने विशेष परिश्रम घेतले आहे.

पान १ वरून

## जरांगे...

जागा सोडू नका, असा सल्ला त्यांनी आंदोलकांना दिला. आवश्यकता पडल्यास आपण संपूर्ण ताकदीनिशी विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही देताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी फक्त एक हाक मारावी, आम्ही अत्यंत मोठ्या संख्येने या आंदोलनात सामील होऊ. वेळ पडली तर सर्व मराठे दिल्लीत येतील आणि हे सरकार उलटवून लावण्याची ताकदही आमच्यात आहे.विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा निषेध करत जरांगेंनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. सध्याचे सरकार हे विद्यार्थ्यांचे मुद्दे पाडण्याचे काम करत आहे, असा संतापजनक आरोप त्यांनी केला. आज संपूर्ण देश आणि राज्य या विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवू नका

## सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाला फटकारले. विशेष सखोल मतदार यादी सुधारणा (एसआयआर) व मतदारसंघ पुनर्रचनेचे कारण पुढे करून निवडणुका पुढील वर्षापर्यंत लांबणीवर टाकता येणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उर्वरित निवडणुका तातडीने घेण्यासाठी किती मनुष्यबळ आणि प्रशासकीय साहाय्य आवश्यक आहे, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही राज्य निवडणूक आयोगाला न्यायालयाने दिले.

या प्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी होणार आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मतदार यादी सुधारणेच्या कामात नियुक्त अधिकाऱ्यांना प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उपलब्ध करून देता येणार नाही का? असा सवाल राज्य निवडणूक आयोगाचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील बलबीर सिंग यांना न्यायालयाने केला.'फेब्रुवारी-मार्चपर्यंत वाट पाहता येणार नाही' यावेळी सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले, 'या निवडणुकांसाठी फेब्रुवारी-मार्चपर्यंत वाट पाहता येणार नाही. आयोगाला आवश्यक मनुष्यबळ आणि प्रशासकीय साहाय्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करता येईल. महाराष्ट्र सरकारने न्यायालयाला सांगितले की, राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. आता केवळ २० जिल्हा परिषद व २११ पंचायत समित्या यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत.

आयोगाचा युक्तिवादराज्य निवडणूक आयोगाच्या वतीने बलबीर सिंग यांनी सांगितले की, विशेष सखोल मतदार यादी सुधारणा प्रक्रिया सुरू असून ती ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल. सध्या संपूर्ण यंत्रणा या कामात गुंतलेली आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी वळवणे कठीण ठरेल.यावर न्या. जॉयमाल्या बागची यांनी स्पष्ट केले की, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारित येतात.

# उपवर्गीकरण आरक्षणाच्या मागणीसाठी संगमनेरात गुरुवारी जनआक्रोश मोर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - अनुसूचित जाती प्रवर्गातील उपवर्गीकरण आरक्षणाच्या मागणीसाठी सकल मातंग समाज, संगमनेर शहर व तालुक्याच्या वतीने गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ रोजी संगमनेर येथे भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच भावी पिढीच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने हा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विविध घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय्य प्रतिनिधित्व व आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, ही प्रमुख मागणी या मोर्चाद्वारे शासनाकडे करण्यात येणार आहे. देशातील काही राज्यांमध्ये उपवर्गीकरणाची अंमलबजावणी झाल्यानंतर महाराष्ट्रातही त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, अशी भूमिका समाज बांधवांनी मांडली आहे.

मोर्चाची सुरुवात गुरुवार, दि. २३ जुलै रोजी सकाळी १० वाजता संगमनेर येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून होणार असून, तेथून प्रांत कार्यालय, नवीन नगर रोडपर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे. यानंतर शासनाच्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात येणार आहे.

सकल मातंग समाजाच्या वतीने संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आपल्या हक्कासाठी संविधानिक मार्गाने लढा देण्यासाठी आणि येणाऱ्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने एक दिवस समाजासाठी द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मोर्चादरम्यान शांतता, शिस्त आणि संविधानिक मूल्यांचे पालन करून आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहनही करण्यात आले असून, समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा जनआक्रोश मोर्चा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## पान १ वरून - शरद पवार यांची मोदींशी...

विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर त्यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. सत्तेची हवा डोक्यात गेल्याने सरकार विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यास तयार नाही, असा आरोप करत त्यांनी तुमच्यात आणि रावणात फरक काय? असा थेट सवाल केंद्र सरकारला केला.

जंतरमंतरवरील आंदोलनाला विविध विरोधी पक्षांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याने हा विषय आता केवळ विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुरता मर्यादित राहिलेला नाही. तो राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचा मुद्दा बनला असून, केंद्र सरकारची पुढील भूमिका आणि आंदोलनाबाबत होणारे निर्णय याकडे देशभरातील विद्यार्थी, पालक आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# दिल्लीमधील विद्यार्थ्यांवर हल्ला ही लोकशाहीच्या इतिहासातील दुर्दैवी घटना - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सोनम वांगचुक हे देशातील आदर्श व्यक्तिमत्व आहे. त्यांचे २१ दिवसांपासून दिल्लीमध्ये उपोषण सुरू आहे. त्यांचे उपोषण हा विद्यार्थ्यांचा व सर्वसामान्यांचा आवाज आहे. हा आवाज सरकारला ऐकू येत नाही हे दुर्दैव आहे. सत्तेचा दर्प केंद्र सरकारच्या वागण्यात दिसत असून हा उद्रेक सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असे सांगताना जंतर-मंतर वरील विद्यार्थ्यांवरील हल्ला ही भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत दुर्दैवी घटना असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल व शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे. दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या हल्ल्याबाबत बोलताना महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सोनम वांगचुक हे शिक्षण क्षेत्रातील देशातील नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरचे आदर्शवत व्यक्तिमत्व आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी त्यांचे जंतरमंतरवर २१ दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. खरे तर सरकारने त्यांच्याशी समन्वय साधायला पाहिजे होता. मात्र २१ दिवसांपासून सरकारचा एक प्रतिनिधी सुद्धा त्यांच्याशी बोलला नाही हे अत्यंत चुकीचे आहे. हा



आवाज विद्यार्थ्यांचा ,सर्वसामान्य युवकांचा आणि ज्या विद्यार्थ्यांनी नीट चा अभ्यास करण्यासाठी मोठे कष्ट घेतले त्यांच्या कुटुंबीयांचा आहे.

विद्यार्थी वर्षभर अभ्यास करतात. आणि अचानक पेपर फुटी मुळे पेपर रद्द होतो काय अवस्था त्या विद्यार्थ्यांची होते. त्यांच्या प्रति थोडी सुद्धा संवेदना सरकारने दाखवली नाही. सत्तेचा दर्प केंद्र सरकारला आला असून कुणी काहीही करा आम्हाला काही फरक पडत नाही. आम्ही निवडून येतो. असा त्यांचा समज आहे. निवडणुकीमध्ये ते निरनिराळे फंडे वापरतात. पण देशातील तरुणाईचा हा उद्रेक त्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये झालेल्या आंदोलनामध्ये इंग्रजांनी सुद्धा स्वातंत्र्यसैनिकाशी वेळोवेळी संवाद साधला. सोनम वांगचुक यांचे वडील यांनी जेव्हा लडाख मध्ये उपोषण केले. तेव्हा पंतप्रधानपदी असलेल्या इंदिराची गांधी यांनी स्वतः जाऊन त्यांचे उपोषण सोडवले. मात्र सध्याच्या सरकारला जनतेचे काही घेणे देणे नाही. त्यांनी जनतेला गृहीत धरले आहे. सध्या संपूर्ण देशांमध्ये अशांतता निर्माण झाली आहे. सर्वच अनागोंदी वाढली आहे. कॉंग्रेस पक्ष हा लोकशाही वाचवण्यासाठी लढत आहे. आता जनतेने सुद्धा यामध्ये सहभागी झाले पाहिजे. कॉंग्रेसने संसदेमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवाज उठवला. खासदार राहुल गांधी यांनी लोकसभेमध्ये विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडले. नीटच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर ते देशभर जागृती करत आहेत. प्रचंड प्रयत्न त्यांचे सुरू आहे.

देशामधील लोकशाही आणि राज्यघटना जपण्यासाठी सध्या जनतेने पुढे आले पाहिजे. देशात व राज्यात सुरू असलेल्या अनागोंदीची दुरुस्ती दुरु करण्याची जबाबदारी जनतेची आहे. याचबरोबर राज्यामध्ये मतदार पूर्णनिरीक्षण अभियान सुरू आहे. मतदारयादी हा लोकशाहीचा पाया असून सर्वांचे नाव मतदार यादीत आले पाहिजे यामध्ये कोणीही चुकीचे काम करू नये असे ही त्यांनी म्हटले आहे.

### संगमनेरमध्ये भव्य मशाल मोर्चा

**ज्येष्ठ शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांचे २१ दिवसांपासून दिल्लीमध्ये आमरण उपोषण सुरू होते. या आमरण उपोषणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून उलट आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लाठी हल्ला करणाऱ्या केंद्र सरकारच्या विरोधात बुधवार दिनांक २२ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वा. संगमनेर बस स्थानक येथे भव्य मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणी करता देशभरातील हजारो विद्यार्थ्यांचे मागील २१ दिवसांपासून जंतर-मंतर या ऐतिहासिक मैदानावर आंदोलन सुरू होते. २० जुलै रोजी विद्यार्थ्यांनी शांततेच्या मार्गाने संसदेकडे प्रस्थान केले मात्र केंद्र सरकारने या विद्यार्थ्यांवर अत्यंत अमानुषपणे लाठी हल्ला केला.**

# अबीर गुलाल उधळीत रंग... भक्तीच्या परमोच्च अवस्थेचे दर्शन

अबीर गुलाल उधळीत रंग । नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग ।।

संत चोखामेळा महाराजांचा हा अभंग केवळ काव्य नसून, भक्तीच्या उत्कट आणि परमोच्च अवस्थेचे दर्शन घडवणारा आध्यात्मिक अनुभव आहे. या अभंगातील प्रत्येक शब्दामागे भक्ती, प्रेम आणि परमेश्वराशी असलेले एकरूपतेचे गूढ दडलेले आहे.

पांडुरंगाला प्रिय असलेला अबीर, गुलाल आणि काळा बुक्का ही केवळ धार्मिक प्रतीके नाहीत, तर वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेची ओळख आहेत. आजही लाखो वारकरी पंढरपूरहून प्रसाद म्हणून काळा बुक्का घरी घेऊन येतात आणि तो सर्वांना वाटतात. गळ्यात तुळशीची माळ आणि कपाळी काळा बुक्का ही वारकरी संप्रदायाची खरी ओळख मानली जाते.

या अभंगातील नाथा घरी या शब्दाचा अर्थ अनेकदा चुकीचा घेतला जातो. येथे नाथ म्हणजे संत एकनाथ महाराज नव्हेत. कारण संत चोखामेळा हे संत एकनाथ महाराजांच्या आधी होऊन गेले. येथे नाथ म्हणजे स्वयं परब्रह्म पांडुरंग आणि नाथा घरी म्हणजे परमेश्वराचे घर, अर्थात पंढरपूर.

पहाटेच्या मंगलप्रहरी, उगवत्या प्रकाशात अबीर-गुलालाच्या रंगांनी नटलेले विठ्ठल मंदिर पाहून संत चोखामेळा महाराजांच्या अंतःकरणात जो भक्तिभाव जागृत झाला, त्यातूनच त्यांनी अबीर गुलाल उधळीत रंग, नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग असे शब्द उच्चारले असावेत.

काळ्या बुक्क्याबद्दलही एक सुंदर आख्यायिका सांगितली जाते. श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी आलेल्या गोपींनी डोळ्यातील काजळ कपाळी लावले होते. परंतु प्रत्यक्ष श्रीकृष्णाचे दर्शन होताच त्या इतक्या तल्लीन झाल्या की त्यांना स्वतःचे भानच राहिले नाही. त्या दिव्य भेटीच्या स्मरणार्थ कपाळी बुक्का लावण्याची परंपरा पुढे रूढ झाली, असे सांगितले जाते.



ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर आपल्या प्रवचनात सांगतात की, भक्ताच्या अंतःकरणात परमेश्वराविषयी निर्मळ प्रेम निर्माण झाले की त्याला भाव म्हणतात. हा भक्तीचा पहिला टप्पा आहे. परंतु जेव्हा हे प्रेम इतके उत्कट होते की त्या प्रेमाने स्वतः पांडुरंगालाच नृत्य करावसे वाटते, तेव्हा ती भक्तीची सर्वश्रेष्ठ अवस्था ठरते. संत चोखामेळा महाराजांच्या अभंगातील नाचे माझा सखा पांडुरंग हा याच अनुभूतीचा आविष्कार आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात,

बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले ।।

भक्ताच्या प्रत्येक शब्दात, प्रत्येक कृतीत आणि प्रत्येक श्वासात जेव्हा विठ्ठल प्रकट होतो, तेव्हा त्याचे संपूर्ण जीवनच पंढरपूर बनते. देह पंढरपूर होतो, डोळे चंद्रभागा होतात आणि त्या चंद्रभागेत स्वतः पांडुरंग स्नान करतो.

अशा अवस्थेत भक्ताच्या अंतःकरणात माझा सखा पांडुरंग आनंदाने नाचत येतो. तो अबीर-गुलाल उधळत येतो. हा अनुभव केवळ भक्तिभावातूनच प्राप्त होतो.

वारकरी कपाळाच्या मध्यभागी बुक्का लावतात. योगशास्त्रानुसार हे स्थान आज्ञाचक्राचे आहे. दोन्ही भुवयांच्या मधील या बिंदूकडे अंतर्मुख होऊन पाहायला शिकणे म्हणजेच विठ्ठलाचे दर्शन घेण्याची साधना होय. कपाळावरील बुक्का हा त्या अंतर्मुख प्रवासाचे प्रतीक आहे.

पंढरपूर हे केवळ योगपीठ नाही, तर महायोगपीठ आहे. योग म्हणजे जीवाचे भगवंताशी एकरूप होणे; परंतु महायोग म्हणजे भगवंत स्वतः भक्ताला भेटण्यासाठी खाली येतो. म्हणूनच पंढरपूरला महायोगपीठ म्हणतात.

आजही या महायोगपीठात लाखो वारकऱ्यांसोबत परब्रह्म पांडुरंग ताल धरून नाचत आहे. येथे प्रत्येकाच्या कपाळी काळा बुक्का, गळ्यात तुळशीची माळ आणि मुखी ज्ञानोबा-तुकारामचा अखंड गजर असतो. पालखी सोहळ्यात संगीत आहे, ताल आहे, प्रत्येक अभंगाला सुर आहे आणि लय आहे. म्हणूनच या वारीत सहभागी झालेल्या कोणाचाही जीवनाचा तोल जात नाही; उलट जीवनाला नवी दिशा मिळते.

संत चोखामेळा महाराजांचा अबीर गुलाल उधळीत रंग हा अभंग केवळ पंढरपूरातील उत्सवाचे वर्णन करत नाही, तर भक्तीच्या त्या सर्वोच्च अवस्थेचे दर्शन घडवतो, जिथे भक्ताच्या प्रेमाने स्वतः परब्रह्म पांडुरंग आनंदाने नृत्य करू लागतो. हीच वारकरी संप्रदायाची खरी अनुभूती, हीच वारीची खरी ओळख आणि हीच भक्तीची सर्वोच्च परंपरा आहे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ साठी फार्मर आयडी अनिवार्य

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी बायोमेट्रिक (अंगठा) आधार प्रमाणीकरण करणे तसेच ग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करून फार्मर आयडी तयार करणे अनिवार्य असल्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट आदी कारणांमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन राज्य मंत्रिमंडळाने दि. २ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या योजनेस मान्यता दिली आहे. योजनेअंतर्गत दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांपैकी दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकबाकी असलेली आणि दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे विचारात घेतली जाणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांना एकवेळ समझोता (जढड) योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यानंतर शासनाचा लाभ मिळणार असून त्यासाठी दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तसेच वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार २८२ खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांच्या याद्या लवकरच टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येणार असून त्या ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, विकास सेवा सोसायटी कार्यालय तसेच राष्ट्रीयकृत बँकांच्या नोटीस फलकावर पाहता येतील. तसेच शासनाच्या अधिकृत कर्जमुक्ती पोर्टलवर किंवा जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात आधार क्रमांकाच्या साहाय्याने यादीतील नाव आणि संबंधित युनिक क्रमांक तपासता येईल. यादीत नाव समाविष्ट झाल्यानंतर शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात किंवा बँकेत जाऊन बायोमेट्रिक पद्धतीने आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. तसेच ग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करून फार्मर आयडी तयार झाल्यानंतरच आधार प्रमाणीकरण करता येणार आहे. त्यामुळे अद्याप ग्रीस्टॅकवर नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी ती तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

आधार प्रमाणीकरणावेळी आधार क्रमांक चुकीचा असल्याचे अथवा त्याबाबत असहमती असल्यास संबंधित आपले सरकार सेवा केंद्र, बँक शाखा किंवा नागरी सुविधा केंद्रातील चालक मूळ आधार कार्डाची पडताळणी करून असहमतीची नोंद करतील व संबंधित तक्रार तालुकास्तरीय समितीकडे पाठवून त्याची पावती देतील. कर्ज खात्याच्या तपशीलाबाबत असहमती असल्यास संबंधित तक्रार जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात येईल

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# भटके विमुक्त समाजाला शासकीय दाखल्यांसाठी प्रशासनाकडे साकडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील भटके विमुक्त समाजातील नागरिकांना विविध शासकीय दाखले उपलब्ध करून देण्यासाठी भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने तहसीलदार संगमनेर यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भटका समाज हा उदरनिर्वाहासाठी सतत स्थलांतर करत असल्याने त्यांचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास अपेक्षित प्रमाणात होऊ शकला नाही. सततच्या भटकंतीमुळे अनेक नागरिकांकडे शैक्षणिक नोंदी तसेच जातीचे पुरावे उपलब्ध नसल्याने त्यांना जात प्रमाणपत्र मिळविताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णयानुसार स्थानिक चौकशी अहवाल व उपलब्ध पुराव्यांच्या आधारे जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. या निर्णयाचा आधार घेत संगमनेर तालुक्यातील भटके विमुक्त नागरिकांना लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी माळ तसेच घुलेवाडी येथील भाटनगर वस्तीमध्ये मागील ६० ते ६५ वर्षांपासून भटके विमुक्त समाजातील नागरिक वास्तव्यास आहेत.या नागरिकांना स्थानिक गृहचौकशी अहवालाच्या माध्यमातून जात प्रमाणपत्र उपलब्ध करून दिल्यास त्यांना शिक्षण, रोजगार तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येईल, असे निवेदनात म्हटले आहे.

भटके विमुक्त संयोजन समितीच्या माध्यमातून कार्यरत असलेली लोकविधान सामाजिक संस्था संगमनेर तालुक्यात काम करत असून, या अभियानात प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी संस्थेचे स्वयंसेवक तयार असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

भटके विमुक्त समाजातील नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी समितीच्या वतीने संदीप आखाडे,कंजारभाट समाजाचे सामाजिक कार्यकर्ते सुनिल अभियेकर,खजिनदार विशाल इंद्रेकर,महिला सदस्य कोमल इंद्रेकर ,बचत गट महिला कार्यकर्त्या सौ विमलताई सावंत , रवि दिवे यांच्या उपस्थित करण्यात आली आहे.

# अकोलेच्या डॉक्टरांची वारीत सेवाभावी आरोग्यसेवा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - श्री अगस्ती ऋषी आश्रम, अकोले ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यानिमित्त करमाळा येथे अकोले मेडिकल फाउंडेशन, अकोले व रोटरी सेंट्रल, अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने वारकऱ्यांसाठी मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात वयोवृद्धांपासून ते तरुण वारकऱ्यांपर्यंत मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला. विविध आजारांचे निदान करून आवश्यक औषधे मोफत देण्यात आली. तसेच पायी चालण्यामुळे पायांना झालेल्या जखमांवर तात्काळ मलमपट्टी व ड्रेसिंग करून वारकऱ्यांना आवश्यक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले. या सेवाकार्यात डॉ. महादेव अरगडे, डॉ. तुषार गावडे, डॉ. सागर कोल्हाळ (कान, नाक व घसा तज्ज्ञ), डॉ. रवि साबळे तसेच अकोले मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष व रोटरी सेंट्रल, अकोलेचे सदस्य डॉ. प्रकाश वाकचौरे (अकोले हॉस्पिटल) यांनी सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी अगस्ती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ, ह.भ.प. दीपक महाराज देशमुख, ह.भ.प. राजेंद्र नवले महाराज, ह.भ.प. गणेश महाराज वाकचौरे, रामचंद्र वावळे, धोंडिबा राक्षे तसेच अनेक वारकरी उपस्थित होते. ॲड. के. डी. धुमाळ आणि ह.भ.प. दीपक महाराज देशमुख यांनी सर्व डॉक्टरांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार केला.

याशिवाय श्री संगमेश्वर पायी दिंडी, लहित येथेही वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सेवा, औषधांचे वितरण तसेच पायाला झालेल्या जखमांची स्वच्छता करून मलमपट्टी करण्यात आली. या ठिकाणी डॉ. सुभाष गोडसे, रमेश गोडसे, सुभाष गावडे, ह.भ.प. निवृत्ती महाराज गावडे, ह.भ.प. प्रशांत महाराज कोटकर, ह.भ.प. हरी महाराज गावडे तसेच वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या आरोग्य शिबिरामुळे वारकऱ्यांना वेळेवर वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले. समाजसेवेचा हा उपक्रम वारकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरला.

यावेळी अकोले मेडिकल फाउंडेशनच्या सचिव सौ. रूपाली वाकचौरे यांनी सांगितले की, वारकऱ्यांच्या सेवेत स्वतःला अर्पण करणे हीच खरी विठ्ठलभक्ती आहे. अकोले मेडिकल फाउंडेशनची वारीतील आरोग्यसेवेची परंपरा सातत्याने सुरू असून, पुढील काळातही अधिक व्यापक स्वरूपात ही सेवा सुरू राहील.

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
BHAGVAN BALIRAM INGLE
TO NEW NAME
BHAGWAN BALIRAM INGLE
BY AFFIDAVIT NO- 949/2026
DATE - 16/07/2026
ADD- A/P LONI GURAV, TAL.KHAMGAON, DIST.BULDHANA,PIN 444303

पाहिजेत
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

# राज्यभर १३ ऑगस्टपासून लाळ खुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम - डॉ. पाटील

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यातील पशुधनाचे लाळखुरकूत (एफएमडी) या घातक विषाणूजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत १३ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभर लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम (फेरी-९) राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे शंभर टक्के लसीकरण करून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या मोहिमेसाठी केंद्र शासनाकडून राज्याला उपलब्ध झालेल्या एक कोटी लसमात्रांचे वितरण आयव्हीबीपी संस्थेकडून करण्यात येत आहे. प्रत्यक्ष लसीकरण सुरू होण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लसींचा साठा वेळेत पोहोचावा, यासाठी शीत साखळीची आवश्यक खबरदारी घेऊन लसींचा पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील कोट्यवधी पशुधनाला लाळखुरकूत रोगापासून संरक्षण मिळण्यास मदत होणार असून पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

लसीकरण परिणामकारक होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मूलन करण्यात येत असून आवश्यक औषधांचा पुरवठा संबंधित संस्थांना करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत सर्व खासगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांनी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुधनाचे लसीकरण करून त्याची नोंद एनडीएलएम (छउङच्) प्रणालीवर केल्यास प्रति पशुधन पाच रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे आणि पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे, या उद्देशाने ही मोहीम राज्यातील सर्व जिल्ह्यांत व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय सेवांसाठी पशुपालकांनी १९६२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सप चॅटबॉट सेवेवर संपर्क साधावा, असेही पशुसंवर्धन विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# सत्य शोधणारे अधिकारी आणि सत्य दाबणारी व्यवस्था

## श्रीकर परदेशी आणि तुकाराम मुंडे यांच्या कारवाईच्या निमित्ताने




महाराष्ट्राच्या प्रशासकीय इतिहासात काही नावे अशी आहेत जी केवळ फायलींमुळे नव्हे तर जनतेच्या मनात घर करतात. त्यापैकी दोन नावे आज विशेष चर्चेत आहेत - डॉ. श्रीकर परदेशी आणि तुकाराम मुंडे. दोघांनीही वेगवेगळ्या विभागात काम केले, पण दोघांचाही हेतू एकच होता - व्यवस्थेतील किड बाहेर काढणे. त्यांनी पुराव्यानिशी सत्य मांडले, धाडसी कारवाई केली आणि जनतेचा विश्वास जिंकला. मात्र त्यानंतर जे घडले ते पाहिले की एक प्रश्न प्रकर्षाने उभा राहतो - अधिकारी सत्य शोधतात, पण व्यवस्था ते सत्य पचवते का?

२०११ ते २०१३ या काळात डॉ. श्रीकर परदेशी नांदेडचे जिल्हाधिकारी होते. त्या काळात शासकीय निधीचा गैरवापर, बोगस विद्यार्थी दाखवून अनुदान लाटणे आणि कागदोपत्री तुकड्या वाढवण्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. याला आळा घालण्यासाठी त्यांनी व्यापक प्रत्यक्ष तपासणी मोहीम हाती घेतली. मोहिमेची आकडेवारी बोलकी आहे. एकूण ३,४७५ शाळांची प्रत्यक्ष पटपडताळणी करण्यात आली. त्यात १०८ संशयास्पद शाळा आढळल्या. या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २० पेक्षाही कमी होती. अनेक शाळा प्रत्यक्षात अस्तित्वातच नव्हत्या, केवळ अनुदानासाठी कागदावर होत्या. ३,५०० पेक्षा जास्त बोगस तुकड्या सिद्ध झाल्या. विद्यार्थी संख्या फुगवून अनुदान लाटण्याचा हा प्रकार होता. बोगस पटसंख्येमुळे सुमारे ४,००० अतिरिक्त शिक्षक निर्माण झाले होते. झालेली कडक कार्यवाही अशी होती की बोगस विद्यार्थी दाखवून निधी लाटणाऱ्या शाळांच्या व्यवस्थापकांवर आणि संस्थाचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून ऋखठ नोंदवण्यात आले. केवळ कागदावर असलेल्या शाळांचे अनुदान कायमचे बंद करण्यात आले आणि काहींची मान्यता रद्द करण्यात आली. बोगसगिरीच्या प्रकरणांमध्ये प्रशासकीय जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली. इतर संबंधित कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू झाली. बोगस पटामुळे निर्माण झालेल्या ४,००० अतिरिक्त शिक्षकांचे वेतन तात्काळ रोखण्यात आले. जोपर्यंत त्यांचे समायोजन होत नाही तोपर्यंत जिल्ह्यासह राज्यात नवीन भरतीवर बंदी घालण्यात आली. बोगस विद्यार्थ्यांच्या नावावर लाटलेला पोषण आहार आणि इतर अनुदानाचा कोट्यवधी रुपयांचा निधी वसूल करण्यासाठी कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या. भविष्यातील उपाय म्हणून पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याचे आधार कार्ड शालेय नोंदींशी लिंक करणे बंधनकारक करण्यात आले. ही मोहीम केवळ आकड्यांची नव्हती. ती एका व्यवस्थेविरुद्धची लढाई होती. शाळा वाटपाचा कार्यक्रम त्यावेळी प्रसाद वाटल्यासारखा झाला होता. राजकीय वर्तुळातूनही शाळांसाठी शिफारसींचा ओघ होता. एका शाळेतील विद्यार्थी दुसऱ्या शाळेत दाखवले, नातेवाईकांची भरती केली. यातून कोणताही पक्ष सुटला नाही. परदेशींनी पुराव्यानिशी बोगस शाळांच्या फायली शासनाकडे सादर केल्या. त्यावेळी काही लोकप्रतिनिधींनी या मोहिमेला विरोधही दर्शवला. आज प्रश्न असा आहे की त्या फायलींचे पुढे काय झाले, किती प्रकरणे निकाली निघाली आणि किती प्रलंबित आहेत याची माहिती सार्वजनिकपणे उपलब्ध नाही.

मे २०२६ मध्ये तुकाराम मुंडे यांनी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला आणि राज्यभर वादळ उठले. अल्पावधीतील आकडे असे आहेत - ९०४ धाडी, ४५७ आरोपी अटक, ३२ आस्थापना सीलबंद, ४२ वाहने जप्त, ३४.६ कोटींपेक्षा अधिक किमतीचा माल जप्त. लक्ष्य कोण होते तर गुटखा-पानमसाल्याचे कारखानदार, घाऊक विक्रेते, भेसळयुक्त दूध, पनीर, तेल, मिठाई बनवणारे, बनावट औषधांचे विक्रेते आणि नियम पायदळी तुडवणारी हॉटेल्स. काही नावाजलेल्या आस्थापनांचे परवानेही निलंबित झाले. केवळ जप्ती नव्हे तर FSS-I 2006, Drugs and Cosmetics -ct 1940, Legal Metrology, Bharatiya Nyaya Sanhita अंतर्गत FIR, खटले आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यात आल्या. संघटित गुटखा रॅकेटसाठी चउजउ-लावण्याचे प्रस्तावही पोलिसांकडे पाठवण्यात आले. त्याआधी दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त असताना त्यांनी बोगस अपंगत्व प्रमाणपत्रांच्या प्रकरणांचा छडा लावला. प्रमाणपत्रांच्या गैरवापरातून नोकऱ्या, प्रमोशन आणि सरकारी योजनांचा लाभ घेण्याचे प्रकार समोर आले. नांदेडमध्ये अशाच एका प्रकरणाची चौकशी झाली होती. अशा अनेक प्रकरणांचा शोध त्यांनी घेतला. परंतु कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची बदली करण्यात आली. एफडीए मध्ये आल्यावर त्यांनी दुधापासून ते मिठाईपर्यंत प्रत्येक वस्तूतील भेसळ उघड केली. लाखो लिटर भेसळयुक्त दूध नष्ट करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील भेसळ रोखणे हे केवळ तपासणी यंत्रणेचे नव्हे तर समग्र नियामक व्यवस्थेचे आव्हान आहे.

श्रीकर परदेशींची कारकीर्दही तितकीच वैविध्यपूर्ण आहे. यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान लोकचळवळ केली. नांदेडमध्ये MGNREG- मधून ६०,००० विहिरींचे पुनर्भरण करून टँकरमुक्त नांदेड पॅटर्न दिला. पिंपरी-चिंचवड आयुक्त म्हणून ४८७ अनधिकृत इमारती पाडून डिमॉलिशन मॅन ठरले. नोंदणी व मुद्रांक विभागात १४ महिन्यात २२,००० कोटींचा महसूल मिळवला. झचज मध्ये २०१५ ते २०२० या काळात ५ फ्लॅगशिप योजनांचे सनियंत्रण केले. सध्या ते प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय म्हणून कार्यरत आहेत. दोघांनीही जे केले ते फक्त कारवाई नव्हती. ती एक मानसिकता होती - गैरप्रकार खपवून न घेण्याची. परंतु त्यानंतर काय घडले? अधिकाऱ्यांनी पुरावे दिले, फायली सादर केल्या, आकडेवारी मांडली. पण त्यानंतरच्या निर्णयप्रक्रियेत राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर काय होते याकडे जनतेचे लक्ष असते. बोगस शाळा असो किंवा भेसळीची प्रकरणे असो, कारवाईनंतर त्यांचे तार्किक निष्कर्ष काय निघतात हा खरा कस आहे. सरकार वारंवार म्हणते की आम्ही भ्रष्टाचार खपवून घेणार नाही. मग अधिकाऱ्यांनी दिलेल्या पुराव्यांवर झालेल्या कारवाईचा पाठपुरावा किती होतो हा प्रश्न उरतोच. किरीट सोमय्यांनी सादर केलेले पुरावे, राज्यात झालेली चर्चा आणि या दोन अधिकाऱ्यांनी केलेले काम यातून व्यवस्थेने काय बोध घेतला हे येणारा काळच ठरवेल.

अधिकारी जर स्वतंत्रपणे काम करू शकले तर ते मुळापर्यंत जातात. श्रीकर परदेशी असो की तुकाराम मुंडे, त्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श घालून दिला. परंतु जोपर्यंत राजकीय इच्छाशक्ती नाही, जोपर्यंत सत्ता टिकवण्यासाठी तडजोडीची पद्धत चालू आहे, तोपर्यंत या अधिकाऱ्यांच्या मेहनतीला केराची टोपलीच मिळणार. म्हणूनच म्हणावे लागते. डॉ. श्रीकर परदेशी यांच्या बोगस शाळांची पटपडताळणी झाली, तशी तुकाराम मुंडेंनी एफडीए मार्फत केलेली कारवाई होऊ नये म्हणजे झाले. अन्यथा सत्य शोधले जाईल, पण न्याय मिळणार नाही. आणि हीच महाराष्ट्राच्या जनतेशी होणारी सर्वात मोठी बेइमानी आहे.

**– गोविंद दळवी, नांदेड**

## महाराष्ट्र शासन

**रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर**
**पत्ता :– बांधकाम भवन, नगर– छ. संभाजीनगर रोड, अहिल्यानगर**

ई–मेल पत्ता :- egsahmednagar.ee@mahapwd.com
दुरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२४१-२४२२९३८

### ई-निविदा सुचना क्र. ०६ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य) विभाग अहिल्यानगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल. खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी, तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य), विभाग अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखात) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री तुळजाभवानी माता व हनुमान मंदिर संस्थान खामगाव येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर | २०.५० | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| २ | श्री विठ्ठल रूक्मिणी अध्यात्मिक केंद्र गोणेगाव (चौफुला) येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | २१.०० | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| ३ | श्री हनुमान मंदिर देवस्थान संस्थान बेलपिंपळगाव येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | २१.०० | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| ४ | श्री जगदंबा माता देवस्थान शिरसगाव येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | ४२.०० | वर्ग V अ व त्यावरील |
| ५ | श्री दत्त कृष्ण सिनाई देवस्थान संस्थान भानसहिवरे येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | २०.५० | वर्ग V अ व त्यावरील |
| ६ | श्री महालक्ष्मी मंदिर संस्थान वरखेड येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | २१.०० | वर्ग V अ व त्यावरील |
| ७ | श्री खंडोबा (म्हाळसा माहेर) सच्चिदानंद बाबा (ज्ञानेश्वर लेखक व नारद मुनी मंदिर देवस्थान नेवासा बुद्रूक येथे परिसर सुशोभीकरण करणे, ता. नेवासा जि. अहिल्यानगर | २१.०० | वर्ग V अ व त्यावरील |

| | |
|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : २३/०७/२०२६ ते दिनांक ३०/०७/२०२६ |
| निविदापूर्व बैठक | निरंक |
| ई–निविदा उघडणे | दिनांक : ३१/०७/२०२६ |


खालीलसंकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1.www.mahapwd.com
2. Mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३.कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/निविदा/२९०५/सन २०२६
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
रो.ह.यो. (कार्य). विभाग,
अहिल्यानगर दिनांक: १५/०७/२०२६

**कार्यकारी अभियंता,
रो.ह.यो. (कार्य) विभाग,
अहिल्यानगर**

# विशेष संपादकीय...

## श्रद्धांजली...



## डॉ. कुमार सप्तर्षी

### एका युगाचा अंत नव्हे तर लोकशाहीच्या मूल्यांचा अखंड चालुच राहाणारा गजर

**युक्रांदचे डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन म्हणजे महाराष्ट्राला झालेली वेदना आहे. सहिष्णू आणि समाजवादी विचारांनी येणाऱ्या प्रश्नांना तोंड देत आणि सत्याग्रही विचाराने वाटचाल करणारे डॉ. कुमार सप्तर्षी हे हजारो युवकांचे स्मृतिस्थान होते. दैनिक युवावार्ता परिवाराचे स्नेही म्हणून त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असायचे. त्यांच्या प्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या कार्यास अभिवादन म्हणून दैनिक युवावार्ता त्यांच्या स्मृतींना सक्रियतेने उजाळा देत आहे.**

जेव्हा समाजात प्रश्न विचारणारे आवाज कमी होतात, तेव्हा लोकशाही कमकुवत होऊ लागते. हे वाक्य डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या संपूर्ण जीवनाचा सार सांगते. त्यांनी आयुष्यभर सत्ता नव्हे, तर सत्याचा पक्ष घेतला; लोकप्रियतेपेक्षा प्रामाणिकपणाची वाट निवडली; संघर्षापासून कधीही पळ काढला नाही. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका राजकीय नेत्याचे नव्हते, तर एका जागृत समाजाचे नैतिक अंतरात्मा होते. आज आपण त्यांच्या स्मृतीला अभिवादन करत असताना केवळ त्यांच्या कार्याचा गौरव करणे पुरेसे नाही. त्यांनी ज्या मूल्यांसाठी संघर्ष केला, त्या मूल्यांची आजची स्थिती काय आहे, हा प्रश्न प्रत्येक जागरूक नागरिकाने स्वतःला विचारला पाहिजे. स्वातंत्र्य मिळून अनेक दशके झाली. भारताने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शेती, संरक्षण, अवकाश संशोधन आणि पायाभूत सुविधांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली. परंतु लोकशाहीची खरी ताकद केवळ आर्थिक विकासात नसते. ती नागरिकांच्या स्वातंत्र्यात, विचारांच्या विविधतेत, न्यायव्यवस्थेवरील विश्वासात, संविधानावरील निष्ठेत आणि मतभिन्नतेचा सन्मान करण्याच्या संस्कृतीत असते. लोकशाही मुल्यावर अढळ श्रध्दा असलेले समाजवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांची उणीव निश्चितपणे जाणवत राहील

डॉ. कुमार सप्तर्षी यांना लोकशाही म्हणजे निवडणुकीपुरती मर्यादित व्यवस्था वाटत नव्हती. त्यांच्या मते लोकशाही म्हणजे नागरिकांची सततची सहभागिता, शासनाला प्रश्न विचारण्याचे धैर्य, जनतेसमोर उत्तरदायित्व आणि संविधानिक संस्थांचे स्वातंत्र्य. निवडणुका जिंकणे हा लोकशाहीचा शेवट नसून प्रारंभ आहे, असे ते सातत्याने सांगत. लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असुन घटनाकारांना अपेक्षित असलेल्या संविधानिक चौकटीत काम करणे ही राज्यकर्त्यांची जबाबदारी आहे अशी त्यांची ठाम भुमिका होती. प्रासंगिक स्वार्थापोटी वा सत्तेच्या हव्यासापोटी राजकीय सोयीनुसार घटना दुरुस्ती करणे वा घटनात्मक तरतुदींचा सोयीनुसार शब्दच्छल करुन घटना पायदळी तुडवणे हे लोकशाहीचा उद्घोष करणाऱ्यांना मुळीच शोभा देणारे नाही. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर तसे होत आले आले आहे आणि होत आहे. लोकशाहीचा सच्चा पाईक म्हणून त्यांनी या सत्तापिपासू प्रवृत्तीचा नेहमीच विरोध केला, वेळप्रसंगी कुणाचा मुलाहिजा न ठेवता सडेतोड दोन शब्द सुनवण्यासही त्यांनी कधी मागेपुढे पाहिले नाही. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांनी एकमेकांच्या अधिकार कक्षेत हस्तक्षेप न करणे तसेच लोकशाहीचा चौथा खांब असलेली निरंकुश पत्रकारीता हे सुदृढ आणि परिपक्व लोकशाहीचे लक्षण आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या या विचारसरणीने उदयोन्मुख तरुण पिढी प्रभावित झाली होती. त्यांनी स्थापन केलेल्या युवक क्रांती दलाच्या (युक्रांद) माध्यमातून त्यांनी या तरुण पिढीला यथोचित रस्ता दाखवला. आज समाजात एक वेगळे चित्र दिसते. वेगवेगळ्या विचाधारेचे राजकीय ध्रुवीकरण वाढत आहे. सोशल मीडियावर अफवा, अर्धसत्य आणि द्वेषपूर्ण प्रचार वेगाने पसरतो. संवादाऐवजी घोषणांचा गोंगाट वाढतो. विचारांऐवजी व्यक्तिपूजा वाढते. अशा वातावरणात विवेक, चिकित्सकता आणि सार्वजनिक नैतिकता जपणाऱ्या व्यक्तींची गरज अधिक भासते. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे संपूर्ण जीवन याच मूल्यांचे जतन करण्यासाठी वाहिले गेले. आज खऱ्या अर्थाने त्यांची आवश्यकता होती. त्यांनी युवकांना केवळ आंदोलनाची भाषा शिकवली नाही, तर लोकशाहीची भाषा शिकवली. त्यांनी सांगितले की आंदोलन म्हणजे हिंसा नव्हे; आंदोलन म्हणजे अन्यायाविरुद्ध संविधानिक मार्गाने उभा केलेला नैतिक आवाज. युवक क्रांती दलाच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना समाज, संविधान, इतिहास, अर्थकारण आणि लोकशाही यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा दिली. विचाराशिवाय आंदोलन अंध होते आणि मूल्यांशिवाय राजकारण धोकादायक ठरते, ही त्यांची भूमिका होती. डॉ. कुमार सप्तर्षी यांचा गांधीवाद हा केवळ चरखा किंवा खादीपुरता मर्यादित नव्हता. त्यांचा गांधीवाद म्हणजे सत्याची निर्भय बाजू घेणे, अहिंसेवर विश्वास ठेवणे, सर्वधर्मसमभाव स्वीकारणे, सर्वात शेवटच्या माणसाचा विचार करणे आणि सत्तेपेक्षा समाजहिताला प्राधान्य देणे. सामान्यतल्या सामान्य माणसाला सरकारला चुकीबद्दल जाब विचारण्याचा हक्क असुन लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा हक्क आहे. जनतेचा आवाज दाबुन दहशतीच्या जोरावर कारभार करणे ही लोकशाहीची हत्या आहे, अशी त्यांची भुमिका होती. त्यामुळे त्यांचे हे चिरंतन विचारधन सार्वकालिक आहेत.

**उत्तमराव निर्मळ**
**सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता**
**जलसंपदा विभाग**
**मोबाईल 7276772400**

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रणेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य नेते, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार आणि राष्ट्रवादी विचारवंत होते. भारतीय जनतेमध्ये स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना निर्माण करण्याचे त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांना भारतीय असंतोषाचे जनक असेही म्हटले जाते.

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच. ही भारतीय स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणादायी घोषणा दिली. त्यांचे पूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक असून लोकप्रिय नाव लोकमान्य टिळक होते. त्यांचा जन्म दि. २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे झाला. आईचे नाव पार्वतीबाई टिळक तर वडिलांचे नाव गंगाधर रामचंद्र टिळक होते. व्यवसायाने ते शिक्षक, पत्रकार, लेखक, राजकारणी व समाजसुधारक होते.

टिळक हे लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान, प्रामाणिक आणि निर्भय होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण रत्नागिरी येथे झाले. त्यानंतर त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांनी डेक्कन कॉलेजमधून गणित विषयाची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. देशनिर्मितीचे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण असा त्यांचा विश्वास होता.

त्यांनी स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या संस्था पुढीलप्रमाणे आहेत - न्यू इंग्लिश स्कूल (१८८०), डेक्कन एज्युकेशन सोसायटी (१८८४) आणि फर्ग्युसन कॉलेज (१८८५). या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करण्याचे मोठे कार्य केले. टिळकांनी पत्रकारितेचा प्रभावी वापर जनजागृतीसाठी केला. त्यांनी दोन वृत्तपत्रे सुरू केली - केसरी (मराठी) आणि The Mahratta (इंग्रजी). या वृत्तपत्रांतून त्यांनी ब्रिटिश सत्तेवर कठोर टीका केली आणि जनतेमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत केली.

लोकमान्य टिळक हे भारतीय राष्ट्रीय चळवळीतील जहाल गटाचे प्रमुख नेते होते. त्यांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतुःसूत्रीचा प्रचार केला. स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन केले तसेच परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्यास प्रोत्साहन दिले.

सन १८९३ मध्ये टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. लोकांना एकत्र आणणे, सामाजिक ऐक्य वाढवणे, देशभक्तीची जागृती करणे आणि ब्रिटिशांविरुद्ध जनजागृती करणे हा त्यामागचा मुख्य हेतू होता. तसेच त्यांनी सार्वजनिक शिवजयंती उत्सव सुरू केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमातून युवकांना प्रेरणा देणे, राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमान वाढवणे हा त्यामागचा उद्देश होता. ब्रिटिश सरकारने त्यांच्या लेखनावरून त्यांच्यावर अनेक वेळा राजद्रोहाचे आरोप केले. १९०८ साली त्यांना मंडाले कारागृहात सहा वर्षांची शिक्षा झाली. त्याच काळात त्यांनी प्रसिद्ध 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. १९१६ मध्ये होमरूल लीगची स्थापना केली. भारतीय जनतेने त्यांच्या कार्यामुळे त्यांना लोकमान्य ही उपाधी दिली. १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या अथक कार्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला मोठी चालना मिळाली. त्यांच्या विचारांमुळे स्वातंत्र्य चळवळीची गती वाढली.

या थोर नेत्यास विनम्र अभिवादन.

**संकलक**
**सुभाष बाबुराव थिटे**
**संगमनेर, मो. ९२७०३८०८२५**


### रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक आश्रमशाळा, पिंपळदरी, ता-अकोले, जि- अहिल्यानगर

#### निविदा सुचना

रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक आश्रमशाळा, पिंपळदरी, ता-अकोले, जि- अहिल्यानगर हे खालील नमुद केलेल्या कामासाठी बी १ नमुन्यामध्ये योग्य त्या नोंदणीकृत किंवा अनुभवी ठेकेदारांकडून मोहरबंद टेंडर मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजे एस्टिमेट रक्कम | टेंडर सोबत बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | टेंडर फॉमची किमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक आश्रमशाळा, पिंपळदरी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे पिण्याच्या पाण्याचे टाकीचे बांधकाम करणे | ७,१७,७९०/- | ७,२००/- | ३ महिने | १०००/- |

उपरोक्त कामासाठी कोरे टेंडर फॉर्मस् विद्यालय कार्यालयात दिनांक २४-०७-२०२६ ते ३१-०७-२०२६ पर्यंत ऑफिस कामकाजाच्या वेळेत सुट्टीचे दिवस सोडुन मिळतील तसेच भरलेले फॉर्मस दिनांक ०१-०८-२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक आश्रमशाळा, पिंपळदरी, ता-अकोले, जि- अहिल्यानगर यांचे कार्यालयात स्विकारण्यात येतील. ठेकेदारांनी टेंडर सोंबत बयाणा रक्कम रोख अथवा डी.डी. द्वारे विद्यालय कार्यालयात भरावी, बयाणा रकमेशिवाय टेंडरचा विचार केला जाणार नाही. कोणतीही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक आश्रमशाळा, पिंपळदरी, ता-अकोले, जि- अहिल्यानगर यांनी राखून ठेवले आहेत.

**मुख्याध्यापक,**
कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक
आश्रमशाळा, पिंपळदरी, ता-अकोले,
जि- अहिल्यानगर,
मो.नं - ९४२२६६५४२८

### छोट्या जाहिरातासाठीसंपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

### फॅकल्टी पाहिजे
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाइन / ऑफलाइन अभ्यासक्रम
**पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स**
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
**AMVI – 461 जागा MPSC**
(सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
- संपर्क - 6005401510


# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचा शपथविधी सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाच्या Investiture Ceremony चे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना, शिस्त आणि सेवाभाव विकसित करण्याच्या उद्देशाने हा सोहळा पार पडला.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक सचिन प्रभाकर वाकडे उपस्थित होते. त्यांनी बी.एस्सी. (भौतिकशास्त्र) पदवी प्राप्त केली असून १५ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र पोलीस दलात प्रवेश केला. एनसीसीमध्ये त्यांनी Best Cadet हा बहुमान मिळविला. महाराष्ट्रातील सलग सात एनसीसी शिबिरांमध्ये यशस्वी सहभागानंतर त्यांची विशाखापट्टणम येथे आयोजित National Nausainik Camp साठी महाराष्ट्रातून निवड झालेल्या २८ कॅडेट्समध्ये निवड झाली होती. तृतीय वर्षात त्यांनी एनसीसी कॅडेट्सचे नेतृत्व केले. पोलीस सेवेत गेल्या बारा वर्षांमध्ये राजस्थान, गुजरात व मध्यप्रदेशसह विविध राज्यांमध्ये कठीण गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना अटक करण्यामध्ये त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. शाळेचे पीटीएचे पालक प्रतिनिधी या समारंभासाठी आवर्जून उपस्थित राहिले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा व प्रमुख पाहुणे सचिन वाकडे यांच्या हस्ते नव्याने निवड झालेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना नियुक्तीपत्रे व बॅज प्रदान करण्यात आले. यामध्ये हेड बॉय मास्तर देव दिघे, हेड गर्ल शरन्या वामन, सहाय्यक हेड बॉय मास्तर अनय मांदलिक, सहाय्यक हेड गर्ल निकुंज वर्मा यांच्यासह कल्चरल कॅप्टन अनुष्का कदम, डिसिप्लिन कॅप्टन मास्तर आराध्य आंब्रे, ग्रूमिंग कॅप्टन स्वरांजली कदम, लँग्वेज कॅप्टन दिशा देसाई, स्पोर्ट्स कॅप्टन मास्तर प्रत्युष नवले तसेच Aqua, Ignis, Terra आणि Ventus हाऊसचे कॅप्टन्स व सहाय्यक कॅप्टन्स यांचा समावेश होता. त्यानंतर शाळेचा ध्वज नव्या विद्यार्थी परिषदेकडे सुपूर्द करण्यात आला. उपप्राचार्य योगेश आवारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रतिनिधींनी पदाची शपथ घेत जबाबदारीने कार्य करण्याची प्रतिज्ञा केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्काराने कार्यक्रमात रंगत आणली. या नृत्याचे दिग्दर्शन नृत्य शिक्षिका अनुजा वाघमारे यांनी केले. हेड बॉय मास्तर देव दिघे व हेड गर्ल शरन्या वामन यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रमुख पाहुणे सचिन प्रभाकर वाकडे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात शिस्त, प्रामाणिकपणा, नेतृत्व, देशसेवा आणि कठोर परिश्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांनी विद्यार्थी प्रतिनिधींना शुभेच्छा देत आदर्श नेतृत्व करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनामिका शर्मा व यशस्विनी बंगेरा यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन कार्यक्रम समन्वयक पंकज कुटे यांनी केले. तसेच विविध हाऊसचे गव्हर्नर्स ज्योती खिल्लारी, छाया वाणी, कांचन आंब्रे आणि कौशल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाची निवड व कार्यक्रमाचे नियोजन यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेचे समन्वयक श्री संकर्शन मुसमाडे श्रीमती मुक्ता घुंडीयाल आणि श्रीमती जयश्री देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.








### पाहिजेत
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

### फ्लॅट विकणे आहे
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

### पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

### पाहिजेत
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

## दिनविशेष

२०१०: वन डायरेक्शन — या प्रसिद्ध इंग्लिश-आयरिश बॉय बँडची स्थापना झाली.
१९९९: आयलीन कॉलिन्स — या पहिल्या महिला स्पेस शटल कमांडर बनल्या.
१९९५: हेल-बॉप धूमकेतू — शोध लागला, जवळजवळ एक वर्षानंतर हा धूमकेतू पृथ्वीवर उघड्या डोळ्यांना दिसू लागला.
१९९२: अबखाझिया — देशाने जॉर्जियापासून स्वातंत्र्य घोषित केले.
१९८६: हेपेटायटिस-बी — रोगावरील लसीच्या वापरास सुरुवात.
१९७२: लँडसॅट १ — अमेरिकेने पहिला पृथ्वी-संसाधन उपग्रह प्रक्षेपित केला.
१९४२: दुसरे महायुद्ध — जर्मन ऑपरेशन एडलवाईस आणि ऑपरेशन ब्रॉनश्वीग सुरू झाले.
१९२७: आकाशवाणी — मुंबईत रेडिओ क्लबने पहिले रेडिओ प्रसारण सुरू केला, त्याचेच पुढे आकाशवाणीत रूपांतर झाले.
१९२१: चिनी कम्युनिस्ट पार्टी (CCP) — स्थापना झाली.
१८४०: युनियन कायदा — कॅनडाचा प्रांत तयार करण्यात आला.

## जन्म

१९७६: ज्यूडीथ पोल्गार — हंगेरीची बुद्धीबळपटू
१९७५: सूर्य शिवकुमार — तमिळ अभिनेते
१९७३: हिमेश रेशमिया — भारतीय गायक-गीतकार, निर्माते, अभिनेते आणि दिग्दर्शक
१९७०: पॉलीकार्पस झकारियास — भारतीय जेकोबाइट सीरियन ऑर्थोडॉक्स प्रीलेट (निधन: २१ जून २०२२ )
१९६१: मिलिंद गुणाजी — भारतीय अभिनेते
१९४७: डॉ. मोहन आगाशे — अभिनेते, मानसोपचारतज्ज्ञ
१९४२: रिचर्ड ई. डौच — अमेरिकन उद्योगपती, अमेरिकन एक्सलचे सह-संस्थापक (निधन: २ ऑगस्ट २०१३ )
१९२७: धोंडुताई कुलकर्णी — जयपूर-अत्रौली घराण्याच्या गायिका
१९२५: ताजुद्दीन अहमद — बांगलादेशचे पहिले पंतप्रधान (निधन: ३ नोव्हेंबर १९७५ )
१९१७: माई भिडे — नाट्य-चित्रपट अभिनेत्री
१९०६: चंद्रशेखर आझाद — भारतीय थोर क्रांतिकारक (निधन: २७ फेब्रुवारी १९३१ )

## मृत्यू

२०१२: सॅली राइड — पहिल्या अमेरिकन महिला अंतराळवीर (जन्म: २६ मे १९५१ )
२०१२: कॅप्टन लक्ष्मी सहगल — भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि आझाद हिंद सेनेतील नेत्या — पद्म विभूषण (जन्म: २४ ऑक्टोबर १९१४ )
१९९९: दादासाहेब रूपवते — आंबेडकरी चळवळीचे नेते (जन्म: २८ फेब्रुवारी १९२५ )
१९९७: वसुंधरा पंडित — शास्त्रीय गायिका
१९५५: कॉर्डेल हल — अमेरिकन राजकारणी, सचिव — नोबेल पारितोषिक (जन्म: २ ऑक्टोबर १८७१ )
१९१६: विल्यम रामसे — स्कॉटिश रसायनशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पारितोषिक (जन्म: २ ऑक्टोबर १८५२ )
१८८५: युलिसीस एस. ग्रॅन्ट — अमेरिकेचे १८ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २७ एप्रिल १८२२ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**23 जुलै**

## हेपेटायटिस-बी लस : सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील ऐतिहासिक क्रांती




मानवी आरोग्याच्या इतिहासात काही शोधांनी लाखो जीव वाचवले आणि संपूर्ण जगाच्या आरोग्य व्यवस्थेची दिशा बदलून टाकली. अशाच महत्त्वाच्या शोधांपैकी एक म्हणजे हेपेटायटिस-बी या गंभीर आजारावरील लस होय. १९८६ साली या लसीच्या व्यापक वापरास सुरुवात झाली आणि संसर्गजन्य रोगांविरोधातील लढाईत एक नवे पर्व सुरू झाले.हेपेटायटिस-बी हा यकृतावर परिणाम करणारा विषाणूजन्य आजार आहे. हा रोग मुख्यतः संक्रमित रक्त, शरीरातील द्रव पदार्थ, दूषित सुई तसेच आईकडून नवजात बाळाला होऊ शकतो. सुरुवातीला या आजाराची लक्षणे सौम्य स्वरूपाची असली तरी दीर्घकाळ उपचार न झाल्यास यकृत निकामी होणे, सिरोसिस आणि यकृताचा कर्करोग यांसारखे गंभीर परिणाम होऊ शकतात.१९८६ मध्ये या रोगावरील लस उपलब्ध झाल्यानंतर जगभरातील आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला. या लसीमुळे संसर्गाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि लाखो लोकांचे प्राण वाचले. अनेक देशांनी ही लस आपल्या राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट केली.भारतामध्येहहेपेटायटिस-बी लसीकरणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. नवजात बालकांना जन्मानंतर ठरावीक कालावधीत ही लस दिली जाते. याशिवाय आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी तसेच संसर्गाचा धोका असलेल्या व्यक्तींनाही हे लसीकरण करण्याचा सल्ला दिला जातो.हेपेटायटिस-बी लसीचा शोध आणि तिचा वापर हा आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील एक मैलाचा दगड मानला जातो. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि जनजागृतीच्या माध्यमातून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य झाले असून, निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी लसीकरणाचे महत्त्व आजही तितकेच अधोरेखित होते.

## शौर्य आणि बलिदानाचे प्रतीक- क्रांतीसूर्य चंद्रशेखर आझाद

**जन्मदिन विशेष**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात आपल्या अद्वितीय शौर्य, धैर्य आणि बलिदानामुळे अजरामर ठरलेले महान क्रांतिकारक म्हणजे चंद्रशेखर आझाद. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणाऱ्या या वीर पुत्राचा जन्म २३ जुलै १९०६ रोजी मध्यप्रदेशातील अलीराजपूर जिल्ह्यातील भाबरा या गावात झाला. त्यांचे वडील पंडित सीताराम तिवारी आणि आई जगरानी देवी होत्या. बालपणापासूनच त्यांच्या मनात देशभक्तीची भावना प्रबळ होती.१९२१ मध्ये महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनात त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. आंदोलनादरम्यान त्यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले.



न्यायाधीशांनी त्यांचे नाव विचारले असता त्यांनी निर्भीडपणे "माझे नाव आझाद, वडिलांचे नाव स्वातंत्र्य आणि पत्ता जेलखाना" असे उत्तर दिले. त्यांच्या या धाडसी उत्तरामुळे त्यांना फटक्यांची शिक्षा झाली, मात्र त्यानंतर ते संपूर्ण देशात "चंद्रशेखर आझाद" या नावाने प्रसिद्ध झाले.महात्मा गांधींनी असहकार आंदोलन मागे घेतल्यानंतर आझाद यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. त्यांनी हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशन आणि पुढे हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, रामप्रसाद बिस्मिल आणि अशफाक उल्ला खान यांसारख्या क्रांतिकारकांसोबत त्यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात अनेक धाडसी मोहिमा राबवल्या.१९२५ मधील काकोरी रेल्वे कारवाईनंतर अनेक क्रांतिकारकांना अटक झाली, परंतु आझाद पोलिसांच्या हातातून सुटण्यात यशस्वी ठरले. त्यानंतर त्यांनी संघटनेचे नेतृत्व सांभाळले आणि स्वातंत्र्यलढ्याची ज्योत तेवत ठेवली. ब्रिटिश सत्तेविरोधातील प्रत्येक कारवाईत त्यांचे धैर्य आणि नेतृत्व गुण दिसून आले."मी ब्रिटिशांच्या हाती जिवंत सापडणार नाही," ही त्यांची प्रतिज्ञा होती. २७ फेब्रुवारी १९३१ रोजी इलाहाबाद येथील अल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांनी त्यांना घेरले. बराच वेळ त्यांनी एकट्याने ब्रिटिश पोलिसांचा मुकाबला केला. अखेरीस शेवटची गोळी स्वतःवर झाडून त्यांनी आपली प्रतिज्ञा पूर्ण केली आणि मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान दिले.चंद्रशेखर आझाद यांचे जीवन आजच्या युवकांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत आहे.

# लग्नाच्या वऱ्हाडावर सशस्त्र हल्ला

## सात जण जखमी, १५ ते २० जणांविरुद्ध गुन्हा

### लोखंडी रॉड, दगड, दांडके आणि चेनने बेदम मारहाण



कन्हेर पोखरी शिवारातील थरारक घटना

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव -: पारनेर तालुक्यातील कन्हेर पोखरी शिवारात लग्न समारंभ आटोपून परतणाऱ्या वऱ्हाडावर १५ ते २० जणांच्या टोळक्याने सशस्त्र हल्ला केल्याची धक्कादायक घटना रविवारी (२० जुलै) सायंकाळी घडली. या हल्ल्यात सात जण जखमी झाले असून, या प्रकरणी संगमनेर तालुक्यातील बाळंद्री येथील नितीन काळे (पूर्ण नाव उपलब्ध नाही) याच्यासह १५ ते २० जणांविरुद्ध घारगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी एकनाथ बाळू जाधव (वय २६, रा. पोखरी बाळेश्वर) हे आपल्या मामाच्या लग्नासाठी पारनेर तालुक्यातील पवळदरा येथे वऱ्हाडासह गेले होते. लग्न समारंभ आटोपल्यानंतर ते मोटारसायकलवरून परतत असताना कन्हेर पोखरी येथील मराठी शाळेजवळ रस्त्याच्या कडेला झाडांच्या आड लपून बसलेल्या हल्लेखोरांनी अचानक त्यांचा रस्ता अडवला.

भावड्याला तुम्ही काय म्हणाले होते? असा जाब विचारत हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, दगड, लाकडी दांडके तसेच सायकलच्या चेनने वऱ्हाडातील सदस्यांवर बेछूट हल्ला चढविला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. हल्ल्यात सात जण जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी एकनाथ जाधव यांच्या फिर्यादीवरून नितीन काळे व इतर १५ ते २० जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, घारगाव पोलीस पुढील तपास करत आहेत.

**यांच्यावर उपचार सुरू**

**या हल्ल्यात एकनाथ जाधव, सूरज मधे, अक्षय मधे, अजय मधे, दिगंबर मधे, प्रकाश काळे आणि अंकित दुधवडे हे जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीला मृत्यूपर्यंत जन्मठेप



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याला हादरविणारी घटना श्रीरामपूर तालुक्यात घडली होती. याबाबत श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये ०३ जून २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यात अल्पवयीन मुलीला बंदुकीचा धाक दाखवून पळून नेऊन सदर अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. या प्रकरणात विशेष सत्र न्यायाधीश (वर्ग १) एस.एन. साळवे यांनी आरोपी योगेश सिताराम पाटेकर यास दोषी ठरवले आहे. आणि नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात योगेश पाटेकर या आरोपी विरुद्ध भारतीय दंडविधान संहिता कलम ३६३,३६६(अ), ३७६(२)(एन), १०९ सह ३४ तसेच पोक्सो कायद्याच्या विविध कलमा अंतर्गत ४,८,१२,१६ व १७ या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. विषेश न्यायालयाने विविध कलमां नुसार ही शिक्षा देऊन दंडही ठोठावला असून सदर दंडाची रक्कम ही संबंधित पीडितेला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. या खटल्यात सरकार पक्षातर्फे पी. पी.गटणे, एस.आर.नवले व एन.आर. कहाणे यांनी अत्यंत प्रभावीपणे आणि भक्कमपणे आपली बाजू कोर्टात मांडली. त्यांना कोर्टातील काम काजात पी एस आय घाणे यांनी विषेश सहकार्य केले. या गुन्ह्याचा अत्यंत तातडीने तपास करून पी एस आय वेणुगोपाल शिंदे यांनी हजर जबाबी पणे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सरकार पक्षाच्या वतीने एकुण १२ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली होती. शेवटी पीडितेची साक्ष आणि वैद्यकीय पुरावे पाहुन व इतर भक्कम साक्षी पुराव्यांच्या आधारे या न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून वरील कठोरपणे शिक्षा सुनावली आहे.या निकालामुळे संपूर्ण अहिल्या नगर जिल्ह्यात गुन्हेगारी क्षेत्रातील कारवाया करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.






# राजेंद्र गडगे यांच्या पत्नी व मुलाला अटकपूर्व जामीन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दैवी शक्तीच्या नावाखाली असाध्य आजार बरे करण्याचे दावे करून लोकांची आर्थिक, शारीरिक व मानसिक फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी असलेल्या वडगावपान येथील राजेंद्र बापू गडगे यांच्या पत्नी अश्विनी गडगे आणि मुलगा शिवम गडगे यांना संगमनेरचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव अ‍ॅड. रंजना पगार-गवांदे यांच्या फिर्यादीवरून १७ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला होता. गडगे याच्यावर ‘दत्तधाम सरकार’ या यूट्यूब चॅनेलद्वारे कॅन्सर, ब्रेन ट्युमर, वंध्यत्व यांसारखे आजार मंत्रशक्तीने बरे करण्याचे खोटे दावे करून महागडी औषधे विकत कोट्यवधींची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तसेच एआय तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट व्हिडिओ प्रसारित केल्याचाही आरोप आहे.

तपासात कुटुंबाच्या नावावर सुमारे १.५ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ५ कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या १३ पेक्षा जास्त स्थावर मालमत्ता असल्याचे समोर आले. आश्रमावर छापा टाकून ९९ प्रकारची औषधे, ३.३६ लाख रुपये रोख, संगणक, कॅमेरे, लॅपटॉप तसेच आर्थिक कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

बचाव पक्षाने अर्जदारांचा गुन्ह्यात थेट सहभाग नसल्याचा युक्तिवाद केला. एफआयआरमध्ये त्यांच्याविरुद्ध कोणतीही ठोस भूमिका नमूद नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने दोघांना प्रत्येकी ४० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. मात्र, साक्षीदारांवर दबाव आणू नये, त्यांच्याशी संपर्क साधू नये आणि तपासात कोणताही हस्तक्षेप करू नये, अशा कडक अटी न्यायालयाने घातल्या आहेत.

# श्री साई मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सवास उत्साहाने सुरुवात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर:- प्रवरानदीच्या विलोभनीय तीरावर वसलेल्या श्री साई मंदिरात गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे.यावेळी गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून श्री साईबाबांच्या मूर्तीसाठी अत्यंत आकर्षक आणि भव्य चांदीचे सिंहासन अर्पण करण्यात आले आहे. उत्सवानिमित्त श्री साईसचरित ग्रंथाच्या पारायणासाठी विशेष संकल्प सोहळा पार पडला.



छाया – प्रसाद सुतार संगमनेर

या प्रसंगी आयोजित मुख्य पूजेसाठी तसेच संकल्पासाठी श्री. अथर्व व सौ. रिध्दी काळे दांपत्य आणि मंदीराचे विश्वस्त श्री. सम्राट भंडारी यांना बसण्याचा मान मिळाला. ग्रंथाच्या सामूहिक पारायणात आणि धार्मिक विधींमध्ये परिसरातील असंख्य साईभक्तांनी मोठ्या श्रद्धेने भाग घेतला. मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष जसपाल डंग, विश्वस्थ सुरेश मयुर, भालचंद्र काळे, विशाल घोडेकर यांनी विशेष लक्ष देऊन भाविकांना मार्गदर्शन केले. गुरुपौर्णिमेच्या या सोहळ्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर साईनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने फुलून गेला आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर | सिल्क अँण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# हरिश्चंद्रगड, रतनगड आणि सांदणदरी परिसरात पर्यटकांना तात्पुरती प्रवेशबंदी

## नियम मोडणाऱ्यांवर होणार कारवाई


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळे हरिश्चंद्रगड, रतनगड आणि साम्रद येथील सांदणदरी येथे पर्यटकांच्या प्रवेशावर वनविभागाने तात्पुरती बंदी घातली आहे. पावसाळ्यात वाढलेला धोका, दरडी कोसळण्याच्या घटना आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेचा विचार करून नाशिक वन्यजीव विभागाने हा निर्णय घेतला आहे.

नुकतेच हरिश्चंद्रगडावर दरड कोसळून चार पर्यटक जखमी झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर या परिसरातील परिस्थितीचा आढावा घेत वनविभागाने खबरदारीचा उपाय म्हणून पर्यटकांना प्रवेशबंदी लागू केली आहे.

सध्या भंडारदरा, हरिश्चंद्रगड आणि परिसरात मुसळधार पाऊस सुरू असून धबधबे, ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत. दाट धुके, निसरडे रस्ते आणि वेगवान पाण्याचा प्रवाह यामुळे परिसर अत्यंत धोकादायक बनला आहे. विशेषतः आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाची नैसर्गिक दरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांदणदरीत पावसाळ्यात जीवितास मोठा धोका निर्माण होतो.

या निसर्गरम्य स्थळांना दरवर्षी अहमदनगर, नाशिक, पुणे, मुंबईसह राज्यभरातून हजारो पर्यटक भेट देतात. मात्र मागील दोन वर्षांत दाट धुक्यामुळे वाट चुकून एका पर्यटकाचा मृत्यू झाला होता. तसेच पावसाळ्यात अनेक लहान-मोठ्या दुर्घटना घडल्याने वनविभागाने यंदा अधिक कठोर भूमिका घेतली आहे. वनविभागाने पर्यटकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आणि बंदी असलेल्या ठिकाणी जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. कायदेशीर कारवाईचा इशाराअतिवृष्टीमुळे धोकादायक ठरलेल्या या पर्यटनस्थळांवर प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा वनविभागाने दिला आहे. पर्यटकांना सतर्क करण्यासाठी स्थानिक वनरक्षकांकडून सातत्याने सूचना दिल्या जात असून विविध ठिकाणी इशारतीचे फलकही लावण्यात आले आहेत. ही माहिती कळसूबाई-भंडारदरा-हरिश्चंद्रगड अभयारण्याचे वनक्षेत्रपाल रुपेश गावित आणि प्रतिभा सोनवणे यांनी दिली.

# नियोजनातील त्रुटीमुळे शेतकरी आक्रमक

## लिंकिंग केल्यास परवाना रद्द - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरमध्ये युरिया वितरणादरम्यान झालेल्या रस्ता रोको आंदोलनासाठी महायुती सरकार अथवा कृषी विभाग जबाबदार नसून, माजी आमदारांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या शेतकी संघाच्या वितरण व्यवस्थेतील त्रुटीच या परिस्थितीस कारणीभूत असल्याचा गंभीर आरोप आमदार अमोल खताळ यांनी केला. महायुती सरकारवर विनाकारण आरोप करण्याऐवजी शेतकी संघाने स्वतःची वितरणप्रणाली सुधारावी, असा सल्लाही त्यांनी दिला. आ.अमोल खताळ पाटील जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आमदार खताळ म्हणाले की, खरीप हंगामातील युरियाची वाढती गरज लक्षात घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची पहिली आढावा बैठक संगमनेर येथे घेण्यात आली होती. या बैठकीत तालुक्यातील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यानंतर संगमनेर तालुक्यासाठी उपलब्ध असलेल्या युरियापैकी ३५० टन बफर स्टॉक तातडीने खुला करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे शासनाच्या पातळीवर युरियाची कमतरता भासू नये यासाठी आवश्यक ती खबरदारी आधीच घेण्यात आली.

झालेल्या आंदोलनामध्ये महायुती सरकार किंवा कृषी विभागाचा कोणताही हलगर्जीपणा दिसून येत नसल्याचे स्पष्ट करत आमदार खताळ यांनी सांगितले की, शेतकी संघाने उपलब्ध युरियाचे योग्य नियोजन केले होते का, टोकन वाटपाची प्रक्रिया पारदर्शक होती का, तसेच वितरणामध्ये काही त्रुटी राहिल्या का, याची सखोल चौकशी करण्याच्या सूचना कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

यंदा पावसाचे आगमन उशिरा झाल्याने खरीप पेरण्या देखील उशिराने सुरू झाल्या आहेत. परिणामी अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणावर युरियाची मागणी वाढली. ही परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक तेवढा खतसाठा उपलब्ध करून देण्याच्या सूचना कृषी विभागाला यापूर्वीच देण्यात आल्या होत्या. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार कृषी विभागाने बफर स्टॉक खुला करण्याचा निर्णय घेतला आणि मंगळवारपासून युरिया वितरण सुरू करण्याचे जाहीर केले होते. शेतकऱ्यांना टोकन वाटपाची जबाबदारी माजी आमदारांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या शेतकी संघाकडे होती. मात्र, अनेक शेतकरी सकाळपासून रांगेत उभे राहूनही त्यांना युरिया मिळाला नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. यामुळे शेतकी संघाच्या नियोजन आणि वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी होणार आहे. महायुती सरकारने शेतकरी हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. कर्जमाफी, वीजबिल सवलत तसेच कृषी क्षेत्रासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. असे असताना काही पराभवातून वैफल्यग्रस्त झालेले लोक केवळ राजकीय हेतूने शेतकऱ्यांना भडकविण्याचा प्रयत्न करत आहेत का, अशी शंका आता निर्माण होत आहे.

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
- मेंदुविकार शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्योरोपण
- गुडघा प्रत्यारोपण
- पोटाच्या शस्त्रक्रिया
- किडनी शस्त्रक्रिया
- मुत्रविकार शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
- आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८७७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशीनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25